C 13-06-2011 Monday)

जबाब

दिनांक १३/०६/११

अमीरअली इब्राहिम श्रॉफ, वय ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, रा.ठी. प्लॉट क्र. ७०१/७०२, इ विंग, मधुबन को.ऑ.हौ.सोसायटी, यारी रोड, वर्सोवा, मुंबई – ६१,
मोबाईल क्र. – ९३२३७३४६५६

---

मी वरील प्रमाणे असून वर नमूद पत्यावर माझे कुटुंबियांसह सुमारे १० वर्षापासून रहावयास आहे. मी अकाऊंटस्चे काम करीत होतो परंतु आता त्यातून निवृत्त झालो असून, माझी तीन मुले नामे १) रियाज, वय ३७ वर्षे, व्यवसाय – बॅंकेमध्ये नोकरी, २) फैयाज, वय ३५ वर्षे, व्यवसाय – बिझनेस व आसिफ, वय ३३ वर्षे, व्यवसाय – बिझनेस हे सध्या काम करतात.

आझाद मैदान पोलीस ठाणे गु.र.क्र. २४२/१० कलम ४२०,४६५,४६७,४६८,४६९,४७१, ४७४,१२०(ब),५०६,३४ भा.दं.वि. या गुन्हयाचे अनुषंगाने स.पो.नि. केंगार यांनी मला पत्र पाठवून गुन्हयाच्या तपासकामी हजर रहाणेबाबत कळविल्याने आज रोजी मी समक्ष हजर राहून लिहून देतो की, नमूद पत्रान्वये माझेकडे मागणी करण्यात आलेल्या श्रीमती रजिया अमीरअली श्रॉफ यांनी मुलगा नामे आसिफ व फैय्याज यांना दिलेल्या दिनांक १२/०४/१९९९ रोजीच्या अधिकार पत्राच्या मूळ प्रती तसेच श्रीमती रजिया असिफअली श्रॉफ, श्रीमती मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी बांद्रा येथील सीटी सर्व्हे क्र. एच/३४६, एच/३४७, एच/३४८, एच/३४९ येथील जागा फैयाज व आसिफ यांच्या नावे करण्याबाबत दिलेल्या अधिकार पत्राच्या मूळ प्रती व सीटी सर्व्हे क्र. १२१ महालक्ष्मी इंटर्न साईड ऑफ वरळी, लोअर परेल डिव्हिजन १/४७, २/४७, ११७, ११८, ११९, १२०, १२१ यांचे मूळ मालमत्ता पत्रक माझ्याकडे नाहीत. ते सीटी सर्व्हे कार्यालयाकडून आपणास मिळू शकतील.

परंतु मी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली याचिका क्र. २६७७/०७ ची प्रत तसेच श्रीमती रजिया श्रॉफ, श्रीमती मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांचे पॉवर ऑफ अटर्नीच्या प्रती मी या सोबत सादर करीत आहे.

माझा जबाब मराठीत टंकलिखित केला असून, तो मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितला माझे सांगण्याप्रमाणे तो बरोबर आहे.

---

समक्ष

[signature] 13/06/2011
1250
SB HO
2/10

सहाय्यक पोलीस निरीक्षक
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.